<u>ई-फायलिंग.</u>

**MHAU080019222025**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.४७८/२०२५.**

**राहिबाई व इतर वि. महाराष्ट्र शासन**

## <u>निशाणी क्र.१ खालील आदेश</u>

अर्जदार क्र.१ ते ३ व गैरअर्जदार क्र. २ ते ६ यांना वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदार यांनी अर्जामध्ये असे कथन केले आहे की, मयत सरुबाई येडूबा खरात यांचे दिनांक २९.०५.२०२५ रोजी मौजे कायगाव ता. सिल्लोड जि. औरंगाबाद येथे निधन झालेले आहे. मयत सरुबाई येडूबा खरात यांच्या पतीचे यापूर्वीच निधन झालेले आहे. तसेच, मयत सरुबाई येडूबा खरात यांचा मुलगा अंबादास येडूबा खरात याचे दिनांक ०८.११.२०२४ रोजी निधन झालेले आहे त्यांच्या वारसांना प्रस्तुत अर्जात गैरअर्जदार क्र.२ ते ६ म्हणून समाविष्ट करण्यात आले आहे. अर्जदार क्र. १ ते ३ ह्या मयताच्या मुली आहेत. गैरअर्जदार क्र. २ ही देखील मुलगी आहे. गैरअर्जदार क्र. ३ ते ५ हे मयताचे नातू आहे. तसेच, गैरअर्जदार क्र. ६ ही मयताची सून आहे. अर्जदारांशिवाय मयतास इतर कोणीही वारस नाही असे अर्जामध्ये नमूद केले आहे.

**३.** प्रस्तुत अर्जात गैरअर्जदार यांनी हजर होऊन म्हणणे दाखल करण्यासाठी वेळ मिळण्याची विनंती केली. तथापि, गैरअर्जदार यांना पुरेशी संधी देऊन देखील गैरअर्जदार यांनी त्यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल न केल्यामुळे दिनांक २०.०४.२०२६ रोजी गैरअर्जदार याच्याविरुध्द म्हणणे नाही असा आदेश पारित करुन प्रस्तुत अर्ज चालविण्यात आला.

**४.** अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी मयताचे वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता त्यांनी प्रस्तूत अर्ज दाखल करुन मंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

**५.** अर्जदारांनी अर्जातील कथनाच्या सत्यतेसाठी अर्जदार क्र.१ ते ३ यांनी साक्षीपुराव्याचे शपथपत्र नि.क्र.११ ते १३ वर अभिलेखावर दाखल करुन अर्जातील कथनांचा

11/8/26

पुर्नउल्लेख केला आहे. आणि नि.क्र.१४ वरती पुरसिस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केला आहे. तसेच अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या आधारकार्डांच्या प्रती, मयतांच्या मृत्यू प्रमाणपत्राच्या प्रती, यादीसोबत दाखल केल्या आहेत. त्याचप्रमाणे अर्जदार यांनी न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र दैनिक "**आनंद नगरी**" मध्ये दिनांक १९.०२.२०२६ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले, मात्र मुदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदारांनी वर नमूद कागदपत्रे ऑनलाईन पद्धतीने अभिलेखावर सादर केलेली आहेत. प्रस्तूत आदेश करतेवेळी अर्जदारांनी वर नमूद मूळ कागदपत्र न्यायालयात सादर केली आहेत. सदर सर्व कागदपत्रांची या न्यायालयाने पडताळणी व अवलोकन केले आहे. अर्जदारांनी अभिलेखावर दाखल केलेल्या सर्व कागदपत्रांच्या अवलोकनावरुन हे स्पष्ट होते की, अर्जदार क्र.१ ते ६ व गैरअर्जदार क्र. २ ते ५ हे मयताचे औपचारिक कायदेशीर वारसदार आहेत.

६. अर्जदारांनी ते मयतांचे वारस असून त्यांनी शासकीय, निमशासकीय कामकाजासाठी वारस प्रमाणपत्राची विनंती केलेली आहे. मुंबई अधिनियम १८२७ VIII चा हेतू हा मयताच्या वारसांची ओळख पटविण्याचा असून सदर अधिनियमाच्या नियम २ व ३ प्रमाणे वारसांच्या मागणीस कोणाचाही आक्षेप नसल्यास त्यांच्या हक्कात न्यायालय वारस प्रमाणपत्र देवू शकते. प्रस्तूत वारस प्रमाणपत्र केवळ संबंधित मयताचे औपचारिक कायदेशीर वारस म्हणून वारसांची ओळख निश्चित करण्यासाठी जारी केले जाते. या प्रमाणपत्राद्वारे मयतांच्या जंगम आणि स्थावर मालमत्तेमधील मालकी हक्क घोषित केले जात नाहीत.

७. अर्जदारांनी दाखल केलेली कागदपत्रे व त्यांच्या साक्षी पुराव्यावरुन सकृतदर्शनी असे दिसून येते की, अर्जदारांच्या कथनानुसार मयताचे निधन झालेले असून त्यांना अर्जदारांच्या व गैरअर्जदार क्र. २ ते ५ यांच्या व्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. गैरअर्जदार क्र. ६ ही भारतीय उत्तराधिकारी कायद्यानुसार मयताची वर्ग १ ची वारस लागत नाही त्यामुळे गैरअर्जदार क्र. ६ हिच्या नावे मयताचे वारस प्रमाणपत्र देणे उचित होणार नाही. अर्जदारांच्या मागणीस दिलेल्या कालावधीमध्ये आक्षेप नोंदविण्याकरिता गैरअर्जदारांकडून वकिल हजर झाले होते. परंतु त्यांना पुरेशी संधी देऊन देखील आक्षेप दाखल न केल्यामुळे सदरचा अर्ज गैरअर्जदार क्र. २ ते ६ यांच्याविरुध्द विना म्हणणेचा आदेश पारित करुन चालविण्यात आला. गैरअर्जदार क्र. २ ते ६ यांच्याकडून वकील हजर झाल्यामुळे त्यांना

1/8/26

त्यांचा पुरावा दाखल करण्याचा व सदरील अर्जावर युक्तीवाद करण्याची पूर्ण संधी देण्यात आली. अर्जदारांची अर्जातील कथने व त्यांचा पुरावा फेटाळण्याचे कोणतेही कारण नाही. त्यामुळे दाखल कागदपत्रांवरुन अर्जदार व गैरअर्जदार क्र. २ ते ५ हे मयताचे औपचारिक कायदेशिर वारस असल्याचे निष्पन्न होत असल्यामुळे मुंबई अधिनियम कायद्याचे कलम २ व ३ प्रमाणे अर्जदारांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहेत. त्यामुळे, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. मुंबई अधिनियम कायदा १८२७ प्रमाणे **अर्जदार क्र.१ ते ३ व गैरअर्जदार २ ते ५** यांच्या नावे ते मयत **सरुबाई येडूबा खरात** यांचे औपचारिक कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र आवश्यक ते न्यायालयीन मुद्रांक शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे.

३. अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्राचा उपयोग भारतीय उत्तराधिकार कायदा १९२५ मधील उत्तराधिकारी प्रमाणपत्र संबंधीत तरतुदी तसेच महाराष्ट्र न्यायालयीन शुल्क कायदा, १९५९ ची सूची १, अनुच्छेद ११ प्रमाणे आर्थिक लाभ मिळविण्यासाठी करता येणार नाही.

४. अर्जदार यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी सदर प्रमाणपत्रावरुन मिळविलेल्या मालमत्तेची पूर्ण व सत्य आणि प्रमाणीत यादी दिवाणी नियमावलीच्या प्रकरण १४ चे परिच्छेद क्र.३१२ प्रमाणे आदेशापासून सहा महिन्यांच्या आत दाखल करावी.

(ए. एच. तड्डु)
३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
सिल्लोड.

ठिकाण :– सिल्लोड.
दिनांक : ११.०८.२०२६.